**नियमित दिवाणी दावा क्र.५८२/२०२० मधील अर्ज (निशाणी क्रमांक ८) वरील आदेश**

(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१०९२-२०२०)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता खंड ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र (नि.क्र.९) दाखल करण्यात आले आहे.

२. अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :-

मुळ दावा वादीने निरंतर मनाई हुकुम होउन मिळणेकरीता दाखल केला आहे. दावा दाखल करताना टंकलेखनातील चुकीमुळे व नजर चुकीमुळे दावा कलम १ मध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमेमध्ये काही मजकुर नमुद करायचे राहुन गेले तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये व विनंती कलम ११अ व ब मध्ये प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकुर नमुद करायचे राहुन गेले आहे. उपरोक्त नमुद ठिकाणी मुळ वाद पत्रात प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र दुरुस्ती करण्यांस परवानगी न दिल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ वाद पत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींना सदर अर्जावर म्हणणे देण्याची संधी देण्यात आली. तथापि, पुरेशी संधी देवुनही प्रतिवादी क्रमांक १ ते ५ तर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल न करण्यात आल्याने त्यांच्यातर्फे म्हणण्याशिवाय अर्जाचे कामकाज पुढे चालविण्यात आले.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तिवाद ऐकला. मुळ दावा वादीने दावा मिळकतीबाबत निरंतर मनाई हुकुम होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार वाद पत्रात टंकलेखनाच्या चुकीमुळे व नजर चुकीमुळे दावा कलम १ मध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमेमध्ये काही मजकुर नमुद करायचे राहुन गेले तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये व विनंती कलम ११अ व ब मध्ये प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकुर नमुद करण्याचे राहुन गेले आहे. सदर प्रस्तावित दुरूस्तीस प्रतिवादींतर्फे कोणतीही हरकत घेण्यात आलेली नाही. दाव्याचे स्वरुप व मागणी पाहता दाव्याचा अंतिम निकाल होण्याकरीता वादीने प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे मुळ दाव्यात दुरूस्ती होणे आवश्यक आहे. वादीने विनंती केलेली प्रस्तावित दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादींना कैफियत देण्याची मुभा असणार आहे. परवानगी नाकारल्यास पुढील गुंतागुंत वाढणार आहे. अशा परिस्थितीत, दाव्याचा गुणदोषावर निर्णय करण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. पर्यायाने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आ दे श**

१. अर्ज (नि.क्र.८) मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती मुळ दाव्यात करावी व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI VILAS PEKHALE PURKAR

Digitally signed by JYOTI VILAS PEKHALE PURKAR
Date: 2022.03.09 17:06:49 +0530

संगमनेर.
दिनांक :- ०९.०३.२०२२.

(ज्यो. वि. पेखळे-पुरकर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.